**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्ता कायम राखणार असल्याचं मतमोजणीत स्पष्ट

- उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी एसटीचा सर्वसमावेशक 'पंचसूत्री आराखडा'

- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात ऑक्टोबर महिन्यात घट

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळून दिवसअखेर भारताच्या १ बाद ३७ धावा

**आणि**

- प्रसिद्ध अभिनेत्री कामिनी कौशल यांचं निधन

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित NDA, अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्पष्ट बहुमताकडे वाटचाल करत असून राज्यात सत्ता कायम राखणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. आज सकाळी मतमोजणी सुरु झाल्यापासूनच बहुतांश जागांवर NDAचे उमेदवार प्रतिस्पर्धी उमेदवारांपेक्षा आघाडीवर होते. आतापर्यंत हाती आलेले निकाल आणि कल असे आहेत.

भाजपानं ५५ जागा जिंकल्या असून ३५ ठिकाणी त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

संयुक्त जनता दलानं ३३ जागा जिंकल्या असून ५१ ठिकाणी त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

राष्ट्रीय जनता दलानं ८ जागा जिंकल्या असून १७ ठिकाणी आघाडीवर आहे, आणि लोकजनशक्ती पार्टीनं ७ जागा जिंकल्या असून १२ जागांवर आघाडीवर आहे, कॉंग्रेस १, एआयएमआयएम ४, राष्ट्रीय लोकमोर्चानं १ आणि हिंदुस्थानी अवाम मोर्चानं १ जागा जिंकली आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळालेल्या विजयाबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. ते नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलत होते. हा विजय म्हणजे केंद्रातल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेनं दाखवलेला विश्वास असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड... बाईट - मुख्यमंत्री**

या निवडणुकीत इतर सर्व मुद्दे बाजूला पडून विकास आणि सुशासन हेच मुख्य मुद्दे ठरले आहेत. त्यामुळे कॉंग्रेस आणि राहुल गांधी यांनी देशभरात केलेल्या विषारी प्रचार चालवला होता, त्याला बिहारच्या जनतेने उत्तर दिल्याचंही फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

देशात ८ विधानसभा मतदारसंघांमधे झालेल्या पोटनिवडणुकीपैकी ६ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात जम्मू कश्मीरमधल्या नागरोटा मतदारसंघात भाजपाच्या देवयानी राणा, तर बडगाममधे जम्मू काश्मीर पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टीचे आगा सईद मुन्तजिर मेहदी विजयी झाले आहेत. कॉंग्रेसचे उमेदवार तेलंगणात ज्युबिली हिल्स आणि राजस्थानातल्या अंता मतदारसंघात विजयी झाले आहेत. मिझोरममधे दाम्पा इथं मिझो नॅशनल फ्रंटचे डॉ. आर लालथंगलियाना, तर पंजाबच्या तरणतारण मतदारसंघात आम आदमी पार्टीचे

हरमीत सिंग संधू निवडून आले. झारखंडच्या घाटशिला मतदारसंघात झारखंड मुक्तिमोर्चा तर ओदिशात भाजपाचे उमेदवार आघाडीवर आहेत.

<><><><><>

राज्याचं हिवाळी अधिवेशन येत्या 28 नोव्हेंबरपासून सुरु होत आहे. या अधिवेशनासाठीच्या तयारीचा आढावा विधीमंडळ सचिव  विलास आठवले यांनी आज घेतला. अधिवेशनासाठी विविध विभागांकडे सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्या तातडीने पूर्ण कराव्यात अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

<><><><><>

एसटी, अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानं उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक ‘पंचसूत्री आराखडा’ तयार केला आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मुंबईत ही माहिती दिली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. आगार पातळीपासून प्रादेशिक कार्यालयापर्यंत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक स्पष्ट करत, सुधारणा, ‘वेग’ आणि ‘नियमितता’ या आधारे एसटी महामंडळाला पुढे नेण्याचा निर्धार केल्याचं त्यांनी सांगितलं.

यात स्वच्छ, टापटीप बसस्थानकं, प्रसाधनगृहांची दररोज किमान तीन वेळा तपासणी, उशिरा सुटणाऱ्या किंवा रद्द बस फेऱ्यांची प्रवाशांना योग्य माहिती, पर्यायी व्यवस्था आणि अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्धी, अशा प्रवासी सुविधांना केंद्रस्थानी ठेवणारी उपाययोजना राबवली जाणार आहे. तक्रारींची तातडीनं दखल, नोंद आणि निराकरण यावर विशेष भर देण्याचे निर्देश आगार व्यवस्थापकांना दिले आहेत.

एसटीच्या आर्थिक पुनरुत्थानाच्या दिशेनं ही पंचसूत्री केवळ मार्गदर्शक तत्त्वं नाहीत, तर संपूर्ण व्यवस्थेला बदलण्याचा एक ठोस आराखडा आहे. असं मंत्री सरनाईक म्हणाले.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर ऑक्टोबर महिन्यात १ पूर्णांक २१ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला. सप्टेंबर महिन्याच्या तुलनेत त्यात १३ शतांश टक्क्यांची घट झाली. गेल्या महिन्यात अन्नपदार्थ, नैसर्गिक वायू, वीज, खनिज तेल आणि धातू उत्पादनाच्या किमतीत घट झाल्यामुळे चलनफुगवट्याचा दर वाढल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोलकाता इथं इडन गार्डनमध्ये आज सुरु झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळला, आणि दिवसअखेर १ गडी गमावून ३७ धावा केल्या.

दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांचे फलंदाज चांगली कामगिरी करु शकले नाहीत. एडन मार्क्रमच्या ३१ धावा ही त्यांची सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली. भारतातर्फे जसप्रीत बुमराहनं अवघ्या २७ धावा देत ५ बळी घेतले. महमंद सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन तर अक्षर पटेलनं एक गडी बाद केला.

फलंदाजीसाठी आल्यावर भारताचा पहिला गडी लवकर बाद झाला. संघाची धावसंख्या १८ असताना यशस्वी जैस्वाल वैयक्तिक १२ धावांवर बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा के. एल. राहुल १३, तर वॉशिंग्टन सुंदर ६ धावांवर खेळत होता.

**<><><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या १३७वी जयंतीनिमित्त आज देशाने आदरांजली वाहिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर पंडित नेहरु यांना अभिवादन करणारा संदेश लिहीला आहे. नवी दिल्लीत शांतिवन या नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी पुष्पांजली अर्पण केली. दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्रातही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

मुंबईत राजभवन, विधानभवन, तसंच सर्व जिल्हा मुख्यालयांमधे दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहिली. आरोग्यविज्ञान विद्यापीठासह विविध संस्थांमधे हा कार्यक्रम झाला.

पंडित नेहरु यांच्या जयंतीदिनी बालदिन साजरा केला जातो. त्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात लहान मुलांशी संवाद साधला. आकाशवाणी दिल्लीच्या परिसरात लहान मुलांसाठी लिली या चित्रपटाचं प्रदर्शन झालं. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. वेव्ज ओटीटी मंचाबद्दल त्यांनी यावेळी माहिती दिली.

मुंबईच्या नेहरू विज्ञान केंद्रात रॉबिन्सन क्रूसो या त्रिमिती चित्रपटाचं प्रदर्शन झालं. नागपूर मध्यवर्ती कारागृहात, बंदिवानांची त्यांच्या अपत्यांशी भेट घडवून आणण्याचा कार्यक्रम झाला.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचं आज मुंबईतल्या त्यांच्या घरी वार्धक्याने निधन झालं. त्या ९८ वर्षांच्या होत्या. २४ फेब्रुवारी १९२७ रोजी लाहौर इथे जन्मलेल्या कामिनी कौशल यांनी १९४६मध्ये नीचा नगर या चित्रपटापासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. हा चित्रपट कान्स चित्रपट महोत्सवात

त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. दो भाई, नदिया के पार, जिद्दी, पारस, आदर्श, आरजू, झांझर, आबरू, जेलर, नाईट क्लब हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. २०२२मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘लाल सिंग चढ्ढा’ तसंच, २०१९मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘कबीर सिंग’ या चित्रपटांमध्येही त्या झळकल्या होत्या. कौशल यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या एका युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

**<><><><><>**

भरतनाट्यम या भारतीय शास्त्रीय नृत्य करणाऱ्या तपस्यासिद्धी स्कूल ऑफ भरतनाट्यमच्या नृत्यांगनांनी एवरेस्ट बेस कॅम्पवर सादरीकरण केलं आहे. जगातलं सर्वोच्च शिखर असलेल्या एवरेस्टच्या चढाईत बेस कॅम्प हा एक महत्त्वाचा टप्पा असून तो समुद्र सपाटीपासून १७ हजार ६५० फूट उंचावर आहे. कोल्हापूरच्या नृत्यांगना संयोगिता पाटील यांनी आपल्या तीन शिष्यांच्या सोबतीने हे सादरीकरण केलं.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली.

येत्या दोन दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**